# लवथवती विक्राळा (शंकराची आरती)

Lavthavati Vikrala Shiv Aarti

Source: Internet Archive — Shri Samarth Ramdas krut Samagra Granth, Bombay (1891), leaf 517 / printed page 103, आरती सांबाची (selected witness). Also compared: Internet Archive — Kirtan Tarangini part 2, Moghe and Kemkar, ninth edition, Pune (1923), leaf 68 / printed page 62 (comparison witness).

---

VERSE 1

लवथवती विक्राळा ब्रह्मांडमाळा ॥ विषें कंठ काळा त्रिनेत्रीं ज्वाळा ॥
लावण्य सुंदर मस्तकीं बाळा ॥ तेथुनियां जळ निर्मळ वाहे झुळझूळा ॥
जय देव जय देव जय श्रीशंकरा ॥ आरती ओवाळूं तुज विश्वंभरा ॥ जय दे० ॥ १ ॥

Lavthavati Vikrala Brahmandmala || Vishe Kanth Kala Trinetri Jvala ||
Lavanya Sundar Mastaki Bala || Tethuniya Jal Nirmal Vahe Jhuljhula ||
Jay Dev Jay Dev Jay Shrishankara || Aarti Ovalu Tuj Vishvambhara || Jay De || 1 ||

VERSE 2

कर्पुर गौर भोळा नयनीं वीशाळा ॥ अर्धांगीं पार्वती सुमनांच्या माळा ॥
भस्माचें उधळण शितिकंठ नीळा ॥ ऐसा शंकर शोभे उमा वेंल्हाळा ॥ जय० ॥ २ ॥

Karpur Gaur Bhola Nayani Vishala || Ardhangi Parvati Sumananchya Mala ||
Bhasmache Udhalan Shitikanth Nila || Aisa Shankar Shobhe Uma Velhala || Jay || 2 ||

VERSE 3

व्याघ्रांबरफणिवरधर सुंदर मदनारी ॥ पंचानन मुनिजनमनमोहन सुखकारी ॥
शतकोटीचें वीज वाचे उच्चारी ॥ रविकुळटिळक रामदासा अंतरीं ॥ जयदे० ॥ ३ ॥

Vyaghrambarphanivardhar Sundar Madanari || Panchanan Munijanmanmohan Sukhkari ||
Shatkotiche Vij Vache Uchchari || Ravikultilak Ramdasa Antari || Jayde || 3 ||